# फिनोलेक्स, मुकुल माधव तर्फे भात बियाणे वाटप

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि मुकुल माधव फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने फणसोप-कसोप परिसरातील गरजू शेतकऱ्यांना उच्च दर्जाच्या भात बियाण्यांचे वाटप करण्यात आले. गेल्या १२ वर्षांपासून सातत्याने राबवण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध होत असून कृषी उत्पादन वाढीस चालना मिळत आहे.

यंदा कसोप, फणसोप, कुर्ली, वायंगणी आणि मागलाड या पाच गावांतील शेतकऱ्यांना भात बियाण्यांचे वितरण करण्यात आले. या बियाण्यांच्या साहाय्याने ५० एकरांहून अधिक क्षेत्र लागवडीखाली येणार असून शेतकऱ्यांना चांगल्या उत्पादनाची अपेक्षा आहे. फणसोप विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या सहकार्याने आयोजित कार्यक्रमास पंचायत समिती सदस्या




रत्नागिरी : शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करताना मान्यवर.

संजना साळवी, सोसायटीचे प्रतिनिधी मनोज साळवी, राजेंद्र साळवी, समीर साळवी, तुषार साळवी, माजी सरपंच गिरिराज साळवी तसेच कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथील विद्यार्थी उपस्थित होते.

फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाउंडेशनतर्फे रामबाबू संका (डायरेक्टर टेक्निकल), सागर चिवटे (फॅक्टरी मॅनेजर), आशिष आठवले (सिनिअर ऑफिसर – लायझनिंग) आणि शामराव निंबाळकर (सीएसआर ऑफिसर) उपस्थित होते. फिनोलेक्स इंडस्ट्रीज मोगरा लागवड, भाजीपाला लागवड, कृषी प्रशिक्षण आणि अन्य समाजोपयोगी कार्यक्रमांमुळे ग्रामीण भागातील शेतकरी व ग्रामस्थांना मोठा लाभ होत असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

मुकुल माधव फाउंडेशनच्या संस्थापिका तथा फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या संचालिका रितू छाब्रिया यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील शेतकरी आणि गरजू कुटुंबांच्या विकासासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होण्याबरोबरच ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासालाही चालना मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

५० एकरांहून अधिक क्षेत्र लागवडीखाली फणसोप ग्रामपंचायत आणि सहकारी संस्थेच्या मागणीनुसार राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून पाच गावांतील शेतकऱ्यांना भात बियाण्यांचे वाटप करण्यात आले. या बियाण्यांच्या साहाय्याने ५० एकरांहून अधिक क्षेत्रावर भात लागवड होणार असून यंदाच्या हंगामात उत्पादन वाढण्याची अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.